# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १९ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : १४/११/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**१४/११/२०१९ गुरुवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.बालाणी भगतराम रावलमल | श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ |
| श्री.ढेकळे सदाशिव गणपत | श्री.पाटील राजेंद्र झिपरु |
| श्री.पोकळे दिलिप बबनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री.खडके सुनिल वामनराव | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री.सनकत चेतन गणेश | श्री.बरडे नितिन मनोहर |
| श्री.सोनवणे मुकुंदा भागवत | सौ.शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस, मा.आयुक्त, श्री.उदय टेकाळे, मा.उपायुक्त. श्री. अजीत मुठे, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव** :- सभेला सुरुवात करणेत येत आहे. आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य कोल्हे प्रविण रामदास व सन्मा.सदस्या देशमुख प्रतिभा गजानन **यांचे रजेचे** अर्ज **आलेले** असुन **ते** मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर **केलेले आहेत**.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.ॲड . शुचितातार्इ हाडा या महिला म्हणुन आपल्याकडे एक वकील आहेत एक सुशिक्षित , तज्ञ व अभ्यासु व्यक्तीमत्व आहे. त्यांचे अभिनंदन मी शिवसेना गटाकडुन करतो आणि पुढील वाटचालीस शुभेच्छाही देतो आणि या काळात जसं काही गोष्टी घडल्या मागील काही काळामध्ये त्या होत्या समान न्याय देण्याच्या भुमिकेमधुन आम्ही आपल्याकडे बघतोय आपण न्याय प्रोटेक्ट काम करतातच त्या माध्यमातुन आमची इच्छा आहे जळगांव शहराच्या दृष्टीने जे काही प्रश्न असतील जे मांडुन जे काही आम्ही आपल्यासमोर ठेवु त्याचे निराकरण व्हायला पाहीजे आणि आपल्या माध्यमातुन हे नक्कीच होईल अशी आशा आपल्याकडुन करतो येणाऱ्या काळासाठी शुभेच्छा देतो व थांबतो धन्यवाद.

**नगरसचिव :-** मा.सभापती महोदया आपले मनोगत व्यक्त करतील.

**मा.सभापती सो:-** उपस्थित सर्व जण मा.आयुक्त सो , उपायुक्त सो , नगरसचिव , याठिकाणी ज्येष्ठ असलेले व विरोधी पक्षातील ज्येष्ठ नितीन भाऊ बरडे आमचे गटनेते भगत भाई , सुनिल दादा आणि सर्वात ज्येष्ठ ढेकळे दादा आणि माझे सर्वच जण जसे माझे सर्व सदस्य व सर्व सहकारी आजची माझी ही स्थायी ची पहिली सभा आहे ईथे मला आपल्याशी दोन मिनिटे संवाद साधायचा आहे की जितका कार्यकाळ माझ्याजवळ आहे स्थायी समिती सभापती म्हणुन तर या एका वर्षामध्ये जळगांवमध्ये मुलभुत सुविधा पुरविण्याचा मानस आहे आणि ते तेव्हाच शक्य होणार आहे जेव्हा आपल्या सगळयांची साथ मला लाभणार आहे आणि अर्थातच मला याबद्दल खात्री आहेच की आपण एक चांगली टिम म्हणुन आपण हे काम करू थोडस म्हणजे माझे अधिकारी यांचा नावाचा उल्लेख राहुन गेला तर प्रशासनातील सगळेच अधिकारी यांच सुध्दा सहकार्य मला अपेक्षित आहे आणि ते असणारच आहे कारण ईथे सर्व जे अधिकारी आहेत मोस्टली ते सगळे जळगांवकरच आहेत आपण येथे नोकरी वर आहात आपण जबाबदार पदावर आहात पण त्या सगळयात आधी आपण जळगांव कर आहोत आपण सगळेच जळगांवच काहीतरी करून दाखवु आणि त्यासाठी आपल्याला हे काम करायच आहे . आम्ही निवडणुक लढविलेली आहे आणि लोकांनी आम्हाला त्यांच्या सेवेची संधी दिलेली आहे आणि तुम्ही ज्या पदांवर काम करत आहात त्यांना न्याय द्यायचा आहे. एक चांगले काम करू तर आपण सगळेच लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी सहकार्याच्या भावनेने एकत्रित पणे जळगांवातले महत्वाचे विषय मार्गी लावायचे आहेत. स्थायी समिती सभापती पद हे खुप काही मानाचं व महत्वाचं पद आहे आणि त्याच्यामुळे मी त्या पदाची जाण राखण्याची मी १०० टक्के प्रयत्न करणार आहे आणि आपल्या सगळयांच्या सहकार्याने एक चांगला पायंडा पाडु या आणि एक गोष्ट अशी माझ्या डोक्यात आली आहे यातील सगळयात महत्वाची जी पहिली गोष्ट आहे एक स्वच्छ पारदर्शी कारभार त्याचं प्रतिक म्हणुन आपली सभा संपल्यानंतर २४ तासाच्या आंत आपल्या सभेमध्ये जे काही ठराव ठरलेले असतील जे काही आपण मान्य केलेले आहे ते माझी सही झाल्यानंतर लगेच सुपुर्द करायचे आहेत आणि मला वाटतं की ही राज्यातली पहिली महापालिका ठरेल हे असं झाल्यानंतर की २४ तासांच्या आंत सही होवुन सुपुर्द

झाल्यास प्रशासनाकडे तर आपल्याला स्वच्छ आणि पारदर्शी कारभार दाखवता येणार आहे. दुसरी एक गोष्ट दर शुक्रवारी आपण मिटींग घेणार आहोत आठवडयातुन एक मिटींग होण अपेक्षित असतं तर आपण सगळयांच्या सोईसाठी एक वार जर ठरवला तर तो शुक्रवार असावा असं मला वाटतं एक आपल्याला सोमवार किंवा गुरूवार मिटींगला वेळ मिळतो आणि त्यानंतर शुक्रवारी सभा होवु शकते सभेची वेळ ही दरवेळेला ही ११ वाजेचीच असणार आहे आणि म्हणुन हे नियोजन असणार आहे आणि सभेसाठी आपल्याला पुन्हा पुन्हा कॉल करण्याची गरज राहणार नाही. तर दर शुक्रवार ११ वाजता आपली मिटींगची वेळ राहणार आणि २४ तासांच्या आंत ठराव केलेले प्रशासनाकडे आणि आपल्या सगळयांचे सहकार्य निश्चितच असणार आहे तश्या विष्णु भाऊंनी अपेक्षा व्यक्त केल्या व माझं कौतुकही केलं तुम्ही जितकं कौतुक केल तितकचं मी १०० टक्के यशस्वी होण्याचा नक्कीच प्रयत्न करणारं हीच आशा आहे व विनंती करते व माझे मनोगत संपवते.

**नगरसचिव:- विषय क्र. १** दि.११/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि. ११/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामी मक्तेदार शिवा सिक्युरिटी सर्व्हीसेस,जळगांव यांचे एकुण ३१ सुरक्षा रक्षकांसाठी दरमहा रक्कम रु.१३,२६८/- मात्र असे एकुण रक्कम रु.४,११,३०८/- मात्रचे दर दरमहाचे दिलेले दर स्विकृत करुन याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.सभापती सो:-** या मध्ये म्हणजे ईतके सुरक्षारक्षक नियुक्त आहेत यामध्ये जळगांव शहरामधील मेहरूण तलाव करीता सुध्दा आपण देखरेखी साठी सुरक्षा रक्षक नियुक्त करणेसुध्दा आवश्यक आहे म्हणजे त्याठिकाणी जे काही म्हणजे आत्महत्या किंवा जे काही प्रकार घडतात त्या दृष्टीने त्याठिकाणी सुरक्षारक्षक असणे ही एक नितांत गरज आहे. तर हे ३१ व १५ सुरक्षारक्षक खास मेहरूण तलावासाठी वाढीव करावे अशी माझी याठिकाणी एक उपसुचना आहे कारण ३ शिफ्ट मध्ये काम करावे लागते तर एक शिफ्ट साठी ५ कारण मेहरूण तलावाचा जो विस्तार आहे तो तर त्या ठिकाणी आपले तिथे ५ स्पॉट असतील तर त्या ठिकाणी १५ सुरक्षारक्षक असतील तर त्यासाठी मी हे १५ सजेस्ट करते आहे.

**श्री . नवनाथ दारकुडे :-** जळगांव महापालिकेचे ज्या ठिकाणी आपल्या मालमत्ता आहे किंवा काही आहे आज पेपर ला फोटो आले आहेत कारण ज्या ठिकाणी जे रक्षक पुरविले आहेत या ठिकाणी पण सुरक्षा रक्षक पुरवावे कारण या ठिकाणी जे आपले साहीत्य आहे. ते लोक चोरून घेतं आहेत त्यामुळे आपलं सुरक्षा रक्षकांच्या ८ तासांच्या ड्युटया राहतात आणि ते सुरक्षारक्षक १२ तास काम करतात तर असे काही तरी सुरक्षेच्या दृष्टीने तिथे तयार करण्यात यावं आपल्या गार्डन मध्ये कारण तिथे एकही झोका नाहीये व आपला सामान चोरीला जातो या हिशोबाने मी ही एक सुचना आपल्याला मांडु ईच्छितो .

**मा.सभापती सो :-** भोळे साहेब हे पुरेसे आहेत का ?

**श्री.सुनिल भोळे (शहर अभियंता) :-** हो मॅडम, १७ मजली प्रशासकीय इमारत, आयुक्त बंगला, हंजीर बायोमेट्रीक, व वाहन व्यवस्थे करीता अशा ४ जागा फीक्स केलेल्या आहेत त्याकरीता आपल्याला जे ३१ सुरक्षा रक्षक लागणार आहेत त्यासाठी आपण या प्रस्तावाला मंजुरी घेतली होती, आपण जी आता सुचना मांडली त्यासाठी आपल्याला स्वतंत्र प्रस्ताव तयार करून पुढील मिटींग मध्ये प्रस्ताव सादर करावा लागेल.

**मा.आयुक्त सो :-** स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा लागेल आणि दुसरी बाब अशी आहे की एका सुरक्षारक्षकाचा पगार १४ हजार रूपये आहे आणि हे सर्व आपल्याला मनपा फंडातुन द्यायचे आहे जर मग आपण जरी सॅंक्शन केल तरी दरमहिन्याचा हिशोब ठेवावा लागेल त्यांना जेवढे त्याठिकाणी आवश्यक आहे. त्याचा आपण स्वतंत्रपणे विचार करूया.

**श्री.विष्णू भंगाळे :-** आपल्या मनपाची स्थिती लक्षात घेता सभापती महोदयांनी विचार केला होता की मेहरूण तलावाच्या दृष्टीने एक जळगांव चे हित बघता तिथं एक दोन तरी संधी द्यावी कारण तिथ खुप घटना घडतात आपण सभापती महोदयांनी ५ सांगीतले परंतु ५ न करता सुरूवातीला १ किंवा २ सिक्युरीटी भरती आणि त्याला स्विमिंग येत असलेला सिक्युरीटी नेमतांना त्याला जबाबदाऱ्या दोघ द्याव्यात आणि अशी आवश्यकता त्या ठिकाणी आहे आणि या क्षेत्रात भरपुर लोकं आहेत. आपल्याला या आणि या आधीचे आपण ३१ सिक्युरीटी ते सोडुन मेहरूण तलावाच्या साठी सुरवातीला १ /२ जर दिले तर जळगांव शहराच्या दृष्टीने नक्कीच फरक दिसेल असं मला वाटतं.

**मा.आयुक्त सो :-** आपण जर आता १५ वाढवले तर परत २४ लागतील आणि आपल्या मेहरूण तलाव हा अत्यंत विस्तीर्ण आहे त्यामुळे १ आणि २ चा काहीच उपयोग होणार नाही आणि पुन्हा ३ शिफ्ट मध्ये त्यामुळे आकडा जरा निश्चित करावा.

**श्री . विष्णू भंगाळे :-** नाही तसे नाही आजच्या तारखेला तिथे सिक्युरीटी आहे आणि तो फीरता असला आणि आपला जो आता मेहरूण तलावाचा परिसर आहे तिघं बाजुने म्हटंल तर माणुस पुर्णपणे फिरू शकतो तर तो त्या माध्यमातुन थोड लक्ष ठेवेल नको असल्यापेक्षा आपण १ किंवा २ त्या प्रायोरीटीवर ठेवावे येणाऱ्या काळामध्ये म्हणजे कुठल्याही घटना तिथे घडताहेत त्यालाही आळा बसेल त्या माध्यमातुन.

**मा.सभापती सो :-** आता जे ३१ आहेत तर त्यापैकी आपणं ठेवु शकतो का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपल्या अनावश्यक जे काही कर्मचारी आहेत त्यातील काही असतील आपले ड्रायव्हर, लँडर सर्व वगैरेची व्यवस्थित लाईन लागलेली आहे.

**श्री. नवनाथ दारकुडे :-** विष्णू भाऊ या बगीच्याची हालतच झाली नसती ना पेपर वाचला का तुम्ही

**श्री.विष्णू भंगाळे :-** नाही पेपर मध्ये तर फक्त चित्रच दिसतंय आज तिथे कोणाच्या नाही तर कुणाच्या तरी ड्युटया असतीलच साहेब तिथे पारीख पार्क उद्यान असेल, बहिणाबाई उद्यान असेल आज भाऊंचे किंवा गांधी उद्यान ईथे सिक्युरीटी मनपाच्या सहकार्याने उपलब्ध करून दिलेले आहेत तर तिथे कशी व्यवस्था राहते, बहिणाबाई उद्यानाकडे चांगलं पाहिलं जात होत आणि तर आता त्या उद्यानाचे हाल होत असतील तर तिथं साफसफाई वर च जास्त लिहीलेलं आहे तेथे साफसफाई वर सुध्दा लक्ष दिले जात नाहीये .

**श्री. नितीन बरडे :-** साहेब तिथे कुणीतरी असेलच ना.

**श्री.विष्णू भंगाळे :-** तिथे असेल ना याचे काय उत्तर मिळु शकतं मला सभापती महोदय की बहिणाबाई उद्यानामध्ये.

**श्री.सुनिल भोळे :-** आपण जे कर्मचारी नेमलेले होते ते बऱ्याचश्या प्रमाणात कमी झाले आहेत जेवढे कर्मचारी बगीच्यामध्ये असायला पाहजेत तेवढे कर्मचारी नाहीयेत दोन दोन कर्मचाऱ्यांवर बगीचा मेंटेन करत आहेत आता ईव्हन आमच्याजवळ मजुर नसल्यामुळे आपण मागे ठराव केलेला आहे रस्ते रिपेअरींग चे जे काम आहे ते दुसरे मजुर लावुन करून घेत आहोत.

**मा.सभापती :-** जे आहेत ते आता काय करता आहेत का ?

**श्री.सुनिल भोळे :-** हो ते करत आहेत.

**श्री.विष्णू भंगाळे :-** नक्कीच सभापती महोदय मागे आमचा जो इंडो अमेरीकन चा जो रस्ता होता त्याची साहेबांनी काल डागडुगी करून दयावी व काही ठिकाणी गाडया चालतील अश्या दृष्टीने करून दयावी अशी खरच आमची ईच्छा आहे.

**मा.सभापती :-** बगीच्या बद्दलचं मी मार्क केलेलं आहे आणि मेहरूणच ही मी १५ सुरक्षारक्षकांच मी मांडलेल आहे तर हा प्रस्ताव प्रशासनाकडुन लवकरात लवकर आमच्या कडे द्यावा.

**श्री. राजेंद्र पाटील :-** सदर ठरावामध्ये सुरक्षारक्षकांची जी मागणी केलेली आहे आपण सुरक्षारक्षक जरी देवु शकत नसले तरी प्रायोरीटीने ज्या ठिकाणी सुरक्षारक्षक देणं गरजेच आहे मेहरूण तलावाच्या परिसरात पोहणारी जी मुले आहे , महिना दोन महिन्यात बऱ्याचश्या दुर्घटना घडत असतात आणि बालक तिथे दगावत असतात त्यासोबतच आपण आठ दिवसांपुर्वी आपण बघीतलं असेल एका महिलेने त्या ठिकाणी जाऊन आत्महत्या केली आपला सुरक्षा रक्षक असता तर ती महिलेच समुपदेशन करता आल असत आणि तीला परत पाठविता आल असत.

**मा.आयुक्त सो :-** या तलावाच्या दृष्टीने हे निश्चित करता आलं असत आता जर तलावाचं विस्तीर्णकरण पाहील असता तो याबाजुला असतांना ते टोक आणि त्या बाजुला असतांना हे टोक १५ जरी आपण ५ / ५ एका शिफ्ट ला दिले तरी दोन दोन किलोमीटर वर एक मानुस राहील.

**श्री. राजेंद्र पाटील :-** नाही साहेब तसे नाही, आणि त्या तलावाचे जे सौंदर्य आहे ते पण अबाधीत राहील आणि त्या ठिकाणी बरेचश्या म्हशी असतात गुरे असतात त्या तलावामध्ये मोकळे सोडले जातात त्याच्यामुळे प्रदुषण वाढत त्याचं सौदर्य राखण्यासाठी नेमणुक करण्यात यावी.

**श्री. भगत बालाणी :-** सिक्युरीटी एकच ठेवा पण त्याठिकाणी लाईट लावा त्याठिकाणी तुम्ही जे बोलले ते बरोबर बोलले या टोकावर आणि त्या टोकावर तर त्या ठिकाणी तीन लाईट लावा सिक्युरीटी काही कामाचा नाही सर तिथे

तशी तर काही वस्तु नाही की चोरीला जाईल सिक्युरीटी चोरी करतांना त्याला पकडेल त्याठिकाणी तीन टिपर लावावे अशी माझी सुचना आहे. खर्च ही कमी होईल आणि दुर्देवाने कोणी आत्महत्या करीत असेल तर त्याला वाचविण्याचा प्रयत्न तो करील एवढेच आपण करू शकतो.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** मच्छीमारांचे जे टेंडर वगैरे आहे असे आपण काढत का नाही काय कारण आहे त्याच्याने सुध्दा आपले हे जे आहे म्हणजे जे आत्महत्या करतात जो मच्छी पालन करणारा असेल तो सुध्दा हे रोखु शकतो कुठे आहे ते मला कळत नाही मी मागे विचारले होते तर कोर्टात कोणीतरी गेलय मासे वाहुन गेले वगैरे वगैरे म्हणुन त्याला स्टे आहे तो स्टे आजपर्यंत कायम आहे तर याकडे कोणी लक्ष देईल का ?

**मा.आयुक्त सो :-** या केसची माहिती घ्या आणि ते करा.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** याच्याने एक तर महापालिकेचा फायदा ही होईल आणि हया ज्या आत्महत्या वगैरे होताहेत त्याला आळा बसेल आपण हाही खर्च करतो तर ते सुलभ होईल.

**मा.सभापती :-** हा अतिशय स्वागतार्ह आहे प्रशासनाने त्याची माहिति घेवुन त्यावर कार्यवाही करावी .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.२७/०६/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१३७३ सन २०१९-२० मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/३४७ दि.१७/०७/२०१९ चे पत्रान्वये दै. दिव्यमराठी या वर्तमान पत्रात दि.१८/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या ०२ ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-१०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं. १ उघडले असता उक्त कामांचे ०२ मक्तेदाराचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांची छाननी करुन उक्त कामाचे ई-निविदा दराबाबतचे फोल्डर नं. २ ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| निविदा धारकाचे नांव | शिवा सिक्युरिटी सिर्व्हिसेस्, जळगाव | साई मल्टी सर्व्हिसेस |
|---|---|---|
| एकुण सुरक्षा रक्षक ३१ | दर महा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु.१३२६८/- | दर महा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु.१४०००/- |
| | ४११३०८/- | ४३४०००/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवा सिक्युरिटी सिर्व्हिसेस्, जळगाव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा एकुण ३१ सुरक्षा रक्षकांसाठी दर महा रक्कम रु.१३२६८/- मात्र दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु ४११३०८/- मात्र दरमहा इतका तरी 12 महिन्याकरीता (४११३०८ x १२ ) = ४९३५६९६/-मात्र खर्च अपेक्षित आहे. तथापी धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ द्वारा सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय जळगांव यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.धुजिसुरमं/जळ/१५७/२०१९ दि.०४/०२/२०१९ नुसार मासिक किमान वेतन ९३४४ + प्रचलित अधिकभार ४२% म्हणजेच रक्कम रु.३९२४/- अशी एकुण रक्कम रु.१३२६८/- मात्रचे दर निर्धारित केले आहे.परंतु उक्त कामी मक्तेदार शिवा सिक्युरिटी सिर्व्हिसेस्, जळगाव यांचे एकुण ३१ सुरक्षा रक्षकांसाठी दर महा रक्कम रु.१३२६८/- मात्र असे एकुण रक्कम रु.४११३०८/- मात्रचे दर दरमहाचे दिलेले आहे. त्यानुसार १२ महिन्याकरीता (४११३०८ x १२ ) = ४९३५६९६/- मात्र खर्च आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांनी निर्धारित केलेल्या दराशी मक्तेदार यांनी दिलेल्या दरा बरोबर तुलना केली असता दर महा एका सुरक्षा रक्षका करीता रक्कम रु.१३२६८/- मात्र दर आलेले आहे.

उक्त कामी आलेला दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवा सिक्युरिटी सिर्व्हिसेस्, जळगाव यांनी दिलेले दर प्रति सुरक्षा रक्षक प्रति महा रक्कम रु.१३२६८/- मात्रचे (किमान वेतन इतकेच) सर्वात कमीचे आलेले स्विकृत करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार रक्कम रु.४९३५६९६/- मात्रची संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी जळगांव शहरातील मेहरुण तलाव येथे सुरक्षा रक्षकांची आवश्यकता असल्यामुळे प्रशासनाने सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक नियुक्ती करणे कामी सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शिवाजी नगर दुध फेडरेशन रोडवरील खडके चाळ पासून ते सुरत रेल्वे गेट पर्यंतच्या रोडवर दुभाजक बांधणे व रंगकाम करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे आलेले दर स्विकृत करुन याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.३७,७४,१०४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शिवाजी नगर दुध फेडरेशन रोडवरील खडके चाळ पासून ते सुरत रेल्वे गेट पर्यंतच्या रोडवर दुभाजक बांधणे व रंगकाम करणे कामास महासभा ठराव क्रमांक ११ दि. ११/१०/२०१८ अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडेस पत्र क्रं.जमनपा/सा.बां./२१२४/दि. ०६/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यते करीता शिफारस होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१६/प्र.क्रं. १७१ (२६)/नवि-१६, मंत्रालय, मुंबई दि. ०८/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.१२/०२/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१२८५ सन २०१८-१९ मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार दिलेल्या मुदतीत मक्तेदार पद्मालया कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा ११.५% कमीचे कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर १% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार पद्मालया कंन्स्ट्रक्शन यांनी २.५% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.८२४६६९ दि.१२/०३/२०१९ चा रक्कम रु.९४४००/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. त्यानुसार मक्तेदार यांचे निविदा रक्कमेपक्षा ११.५% कमीचे आलेले दरास स्थायी समिती ठराव क्र.११० दि.२०/०६/२०१९ अन्वेय मान्यता प्रदान केलेली आहे त्यानुसार मक्तेदार यांनी निविदे सोबत सादर केलेला २.५% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.८२४६६९ दि.१२/०३/२०१९ चा रक्कम रु.९४४००/- मात्रचा मुळ डी.डी. पत्र मिळाल्याच्या तारखे पासुन ५ दिवसाच्या आत सादर करण्यास तसेच करारनामा करण्यास पत्र क्र.जशमनपा/सा.बा./२५२ दि.२८/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे. परंतु मक्तेदार यांनी उक्त पत्रानुसार दिलेल्या मुदतीत निविदे सोबत सादर केलेला मुळ डी.डी. अदयाप पावेतो निविदा अटी शर्ती नुसार मनपा खजिन्यात जमा केलेला नाही. त्यामुळे मक्तेदार यांना पत्र क्र. क्र.जशमनपा/सा.बा./३५३ दि.२८/०७/२०१९ अन्वये सदरचा डी.डी. पत्र मिळाल्या पासुन ०३ दिवसाच्या आत मनपा खजिन्यात जमा करण्या संदर्भात व तसे न केल्यास आपण निविदा सादर करतेवेळी ऑनलाईन पावती क्र.२४०८३ दि.१२/०३/२०१९ रोजी भरलेली निविदा अनामत रक्कम रु.३७७४३/- मात्र जप्त करण्यात येईल असे कळविण्यात आले होते परंतु मक्तेदार यांनी दिलेल्या मुदतीत मुळ डी.डी.सादर केलेला नाही त्यामुळे मक्तेदार पद्मालया कंन्स्ट्रक्शन यांनी निविदा सादर करतेवेळी भरलेली निविदा अनामत रक्कम रु. ३७७४३/- मात्र जप्त करण्यास व उक्त कामाची फेर ई निविदा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यास व येणा-या पर्यायी खर्चास आयुक्त मनपा यांचे दि.२५/०८/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१४१७ सन २०१९-२० मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं. साबा/५०४/ दि. २२/०८/२०१९ चे पत्रान्वये दै. पुण्यनगरी या वर्तमान पत्रात दि. २३/०८/२०१९ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत दि. २९/०८/२०१९ पर्यंत ०२ ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे त्यानुसार सदर कामाचे दुस-या वेळेस आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ३७७४१०४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | डि.एच.पाटील कंनस्ट्रक्शन प्रोपा विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेइतकेच | ३७७४१०४/- |
| २ | श्री गणानन एन्टरप्राईजेस | निविदा रक्कमेवर २.५% जास्तीचे दराने | ३८६८४५७/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. सदर कामी रक्कम रु ३७७४१०४/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी

रक्कम रु. ३७७४१०४/-मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत २५ कोटी निधीतुन खर्च करणेस व मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकारणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०४ अंतर्गत बालाजी मंदीर मागे ४० सिट्सच्या नविन सार्व.शौचालय बांधणे कामी मक्तेदार निखील कृष्णराज पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% कमीचे आलेले दर स्विकृत करुन याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.४६,४४,१८४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री. नितीन बरडे :-** आपण या पुर्वी शौचालयांकरीता दुरूस्ती व लाईट लावण्याची व्यवस्था आपण केलेली आहे पण आपली लाईट व्यवस्था बंद आहे आपले पाण्याचे टँकर बंद असल्याने त्याठिकाणी स्वच्छता होत नाही या अभियांनाअंतर्गत जी व्यवस्था केलेली आहे ती पुर्णपणे बंद पडलेली आहे जसे समता नगर आहे तेथे चारही ठिकाणी जे शौचालय आहेत ते पुर्णपणे तेथील व्यवस्था बंद पडलेली आहे. ती सर्व बंद आहे.

**श्री. विकास पाटील :-** मी बघतो काय आहे.

**श्री. नितीन बरडे :-** ती सर्व बंद आहे पाणी येत नाही त्याठिकाणी सर्व बंद पडलेली आहेत.

**श्री. विकास पाटील :-** मी आज खात्री करून घेतो मग उद्या तुम्हाला सांगतो.

**श्री. विष्णू भंगाळे :-** अहो तुम्ही अधिकारी आहात ना .

**श्री. नितीन बरडे :-** त्याठिकाणी आपण एलईडी लाईट बसवलेले आहेत त्या शौचालयाकरीता त्याच्या आजुबाजुला ते सर्व बंद आहेत.

**श्री. विकास पाटील :-** लाईटची व्यवस्था लाईट पाहुन घेतो.

**श्री. नितीन बरडे :-** अहो मोठया पोलवर लाईट आहेत.

**श्री. विकास पाटील :-** ती संपुर्ण माहिती घेतो आणि मग तुम्हाला सांगतो.

**श्री. नितीन बरडे :-** लाईट आहेत आजुबाजुला आणि ती पोलवर आहेत.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** परत माझ्या वॉर्डाची समस्या आहे अशोक परदेशी ठेकेदार यांनी जेव्हा स्वच्छता अभियानांतर्गत संडाशी केलेली होती त्यानी दोन वर्षापुर्वी बोरींग केलेली होती मी वेळोवेळी पत्र दिले आहेत तर तो ठेकेदार सोडुन चालला गेला त्याच बिल काढुन टाकलय मी वेगळया बाजुने मांडायला सांगीतलय तरी त्यांनी त्याच्यावर लक्ष दिलेले नाही माझ्या रेकॉर्डवर आहे यांना उत्तर द्यावे लागेल सर.

**श्री. सुनिल पंडीत भोळे :-** त्याठिकाणी आपण त्या ठेकेदाराचे बिल दिलेल नाही.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** बघा बर साहेब.

**श्री. सुनिल पंडीत भोळे :-** होय .

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** तुमचेच लोकं मांडणारे होते आमच्याकडे.

**श्री. सुनिल पंडीत भोळे :-** ते ४० फुटावर असल्याने दिलेले नाही.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** ठिक आहे.

**मा.आयुक्त सो :-** पाण्याची व्यवस्था करा.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** तेथुन जायला रस्ता नव्हता मी साहेबांशी बोललो की याच्यावर काही उपाय काढा . तर ते बोलेले होते की भिंत कोरुन ते काढावे लागेल मग तुम्ही तेथे माती टाकुन काढुन घ्या व त्यानंतर ते काहीच बोलले नाही याच्यावर जसे नितीन भाऊ सांगत आहे की टँकर जातील तर संडाशी साफ होतील नाहीतर साफ होणार नाही

**श्री. सुनिल भोळे (शहर अभियंता) :-** मी चेक करतो आणि सांगतो.

**श्री. चेतन सनकत :-** मा.सभापती ताई आता हे सर्व शौचालयाचे दैनंदिन साफसफाई होत नाही मी त्या संदर्भात उपायुक्त साहेबांना वेळोवेळी सुचना केल्या आहेत .आपण हा जो मक्ता दिलेला आहे त्या मक्तेदाराच्या अटी शर्ती मध्ये कर्मचारी स्पॉट वर थांबत नाहीत मागे ज्या / ज्या वेळेला स्वच्छता अभियानाची टिम आलेली होती त्या / त्या वेळेला आपले महानगरपालिकेचे कायम कर्मचारी काम करीत होते एका ठिकाणी आपण त्यांना पैसे देतोय दुसऱ्या ठिकाणी कायम कर्मचारी तिकडे काम करतोय म्हणजे एका कामासाठी दोन दोन जणांना पैसे द्यावे लागत आहेत ही बाब मी उपायुक्त साहेबांच्या लक्षात आणुन दिलेली आहे आणि पुनश्च हा जो विषय आहे.

**मा.उपायुक्त सो (आरोग्य) :-** हा जो विषय आहे तो यांनी आमच्या निदर्शनास आणुन दिलेला आहे ज्या ज्यावेळी स्वच्छ अभियांनाअंतर्गत टॉयलेट तपासण्याची मोहीम होती त्या त्या वेळी एक्स्ट्रा मनुष्यबळ लावुन त्याठिकाणी काम करून घ्यावे लागलेले आहे परंतु त्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या अनुषगांने त्यांनी कामकाजाच्या ज्या त्रुटी ठेवल्या त्या अनुषगांने आपल्याला काम करून घेणे गरजेच होत आणि त्या करीता त्यांच्या कडुन तो दंड वसुल केला जाईल हा जो ठेका आपण दिला आहे त्याची मुदत आता ३ ते ४ महिन्यानंतर संपत आहे .त्यानंतर साहेबांनी आमच्या दोन ते तीन वेळा बैठका घेतल्या जो काही अनुपालन अहवाल असेल तो आम्ही सभागृहापुढे ठेवतो आणि २२०० जे काही शौचालयाचे सीटस आहेत आणि युरीनल्स म्हणजे पुरूष आणि महिलांच्या ज्या मुताऱ्या आहेत त्याच्यामध्ये आम्ही निवेदन केलेले आहे की आपले टँकर डबल शिफ्ट मध्ये चालवायचे आहे म्हणजे सकाळी ६ ते २ व दुपारी २ ते रात्री ८ ते ८.३० पर्यंत म्हणजे पाण्याचा सप्लाय तिथे पुरेसा होवु शकतो आणि प्रत्येक मुतारी आणि शौचालय साफसफाई नियोजन आम्ही केलेले आहे. त्यासाठी आम्ही श्री.गोयर म्हणुन टॉयलेट स्वच्छतेचे जे निरिक्षक आहे त्याची स्वतंत्र नियुक्ती आपण केलेली आहे आणि उद्या परवा पासुन त्याची अंमलबजावणी आपली सुरु होईल.

**मा.सभापती :-** मला एक म्हणायचे आहे सर दंड वसुल करणे हे आपले उद्दिष्ट नाही. आपल्याकडे जी टीम आहे त्यांच्याकडुन १००% आपण काम करुन घेतलं पाहिजे. त्यावर थोडं व्यक्तीगत लक्ष द्या.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** साहेब आमच्या वार्डातले शौचालय दिवसातुन एक वेळापण स्वच्छ होत नाही. ४-४ व ५-५ दिवसातुन एकदा होते. हे दररोज मी पाहतो आणि तक्रारी देत असतो. वारंवार एस.आय. ला सांगत असतो. आज एका कर्मचाऱ्याला मी बोलविले आमच्या घरासमोरच एक शौचालय आहे. नागरीकांनी सांगितले हा कर्मचारी काल आला होता. आणि फक्त पाणी फेकुन चालला गेला. जे पॅसेज मध्ये शौच केलेलं असत ते फक्त पाणी फेकुन मध्ये टाकुन देतात. अशी परिस्थिती आहे. २ वेळा साफ केलं तर फारच उत्तम होईल. अभिनंदन आहे.

**मा.आयुक्त :-** बरं टँकरची काय परिस्थिती आहे.

**आरोग्याधिकारी :-** रिपेअरींगसाठी मेंटेनन्सला आहे.

**मा. आयुक्त :-** किती दिवसापासुन.

**श्री.लासुरे :-** साहेब ते चालु करुन दिलेले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** फायरच्या बाबतीत काय झालं. मागच्या मिटींगमध्ये पण दोन तिनदा विषय झाला. तर काय पोझिशन आहे. त्याबाबतची पुर्तता व कार्यवाही कुठपर्यंत आलेली आहे.

**मा.उपायुक्त सो (आरोग्य) :-** फायरचे चेचिस आपल्याकडे आलेले आहे. त्याच्यासाठी आपण टेंडर Publish केलेले आहे. पहिले पाकीट उघडलले आहे. आणि टेकनिकल स्क्रुटणीसाठी राहिलेले आहे. एक दोन दिवसानंतर स्क्रुटीनी झाल्यानंतर रेट ओपन होतील आणि त्यानंतर सभापती, स्थायी समिती यांच्या समोर ठेवलं जाईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तुम्ही बघा सर वॉटर ड्रेनेज व साफसफाईच्या बाबतीत म्हटलं तर तुम्ही पत्र दिलं होतं. तुम्ही १६/०८/२०१९ ते ३१/०८/२०१९ मध्ये जवळ जवळ रु.२९,५४०००/- दंड आहे. आपण दंड आकारु नका म्हणत नाही. आता दि.०१/०९/२०१९ ते दि.१९/०९/२०१९ या कालावधीत आपण रु.४६ लाख दंड देतो पण हे जे बिल दिलं त्याच्यातुन कमी केलं का ? मा.अध्यक्ष महोदया व आयुक्त साहेब मागच्या काळामध्ये सत्ताधारींनी मिटींग घेतली साफसफाई व स्वच्छता बाबत परंतु आम्हास शिवसेना सदस्यांना त्या मिटींगमध्ये बोलविण्यात आलं नाही. का बोलविण्यात आले नाही कल्पना नाही.

**मा.सभापती :-** विषयपत्रिकेवरचे विषय झालेनंतर आपण ही चर्चा करु या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटर सन २०१० साली बसविण्यात आले आहे. सदर जनरेटरची आवश्यकतेनुसार वेळावेळी महिंद्रा कंपनीचे अधिकृत सर्व्हिस एजन्सीकडून सर्व्हिसिंग करण्यात येत असते. यापुर्वीची सर्व्हिसींग करणेस सुमारे १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असुन सदर जनरेटरची सर्व्हिसिंग करणे आवश्यक आहे.

सदर जनरेटरची महिंद्रा कंपनीची अधिकृत सर्व्हिस एजन्सी असलेले मक्तेदार स्वप्नगंधा एंटरप्राईजेस, जळगांव यांचेकडून तपासणी केली असता सदर जनरेटरच्या सर्व्हिसिंग सोबतच सर्व्हिसिंग कामी लागणारे आवश्यक साहित्य नविन बसवावे लागेल तसेच जनरेटरची दुरुस्तीची काही अनुषंगिक कामे करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने स्वप्नगंध एंटरप्राईजेस यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१९ रोजीचे प्रोफार्मा इनव्हाईसनुसार GST सह एकुण रु.१९,८१५/- रुपयांचा खर्च म.न.पा.कडे सादर केलेला आहे. तसेच अधिकृत वितरक यांनी १००% रक्कमेची मागणी मटेरियल डिलेव्हरी करते वेळी अदा करणेची मागणी केलेली आहे.

म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील पर्यायी विजपुरवठयासाठी असलेले महिंद्रा कंपनीचे १५ KVA क्षमतेचे जनरेटरचे सॉलिनाईट स्विच, बॅटरी चार्जर इत्यादी नविन बसविणे व इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे कामी विविध साहित्य (स्पेअर पार्ट) व लेबर चार्जेस, जॉबवर्क इत्यादीसह महिंद्रा कंपनीचे अधिकृत एजन्सी असलेले मक्तेदार स्वप्नगंधा एन्टप्राईजेस जळगांव यांचे वरील प्रमाणे प्रोफार्मा इनव्हाईसनुसार GST टॅक्स सह एकुण रु.१९,८१५/- रुपये खर्च अपेक्षित आहे. सदर हॉस्पीटमधील वैदयकीय सेवे कामी आवश्यक पर्यायी विजपुरवठयाची निकड लक्षात घेता जनरेटरची वरील प्रमाणे सर्व्हिसिंग व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरचे काम विदयुत विभागातंर्गत जनरेटर व्यवस्था व दुरुस्ती तसेच ट्राफिक सिग्नल व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी म.न.पा.चेतनदास दवाखाना सिंधी कॉलनी येथील १५ KVA क्षमतेचे महिंद्रा कंपनीचे जनरेटरची सर्व्हिसिंग व अनुषंगिक दृष्टीचे काम महिंद्रा कंपनीचे अधिकृत एजन्सी स्वप्नगंधा एन्टरप्राईजेस जळगांव यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम नुसार संविधा प्रकरण ५ मधील नियम २ (२) चे परंतुकात नमुद तरतुदी अन्वये निविदा न मागविता त्यांचे प्रोफार्मा इनव्हाईस नुसार करुन घेणेस व त्या कामी येणाऱ्या एकुण रु.१९,८१५/- चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी मक्तेदाराशी संविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करणेत येत आहे तसेच प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री. कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- सौ. बेंडाळे उज्वला मोहन**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१५ मध्ये ३० सिट्स सार्व.शौचालय बांधणे कामी मक्तेदार हेमंत अरुण नाईक यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% कमीचे आलेले दर स्विकृत करुन याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.३४,५९,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मध्ये ३० सिटस सार्व.शौचालय बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक १६३ दि. ०६/०६/२०१९ अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून आयुक्त मनपा यांचे कडील पत्र क्रं. जमनपा/साबा/३६ दि. १८/०७/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि. १८/०७/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१३८९ सन २०१९-२० मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं. साबा/४४० दि. ०६/०८/२०१९ चे पत्रान्वये दै. पुण्यनगरी या वर्तमान पत्रात दि. ०७/०८/२०१९ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत दि.२२/०८/२०१९ पर्यंत ०३ ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ३४५९१८५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | हेमंत अरुण नाईक | निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% कमीचे दराने | ३४५९१५०/- |
| २ | पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दराने | ३६३२१४४/- |
| ३ | विलास प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दराने | ३७०१३२८/- |

तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार हेमंत अरुण नाईक यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु ३४५९१५०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी रक्कम रु. १९६००२०/- मात्र स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० अंतर्गत केंद्र व राज्य शासन यांच्या निधितुन व उर्वरीत रक्कम रु. १४९९१३०/-मात्र मनपा निधीतुन करावा लागणार आहे. त्यानुसार मक्तेदार हेमंत अरुण नाईक यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% कमीचे दर स्विकृत करुन महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार रक्कम रु.३४५९१५०/- मात्रची संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे कामी त्यांची विल्हेवाट लावणे कामी मानधनावरील मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांचे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नेमणूक करणे कामी दि.२८/०८/२०१९ पासून नव्याने दरमहा रुपये १४,०००/- प्रमाणे ६ महिन्याच्या कालावधीसाठी एकूण येणारा खर्च रक्कम रु.१,६८,०००/- मात्रला मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया हे जे चार प्रभागाला दोन लोकं आहे त्यापैकी प्रत्येक प्रभागाला एक एक माणुस देण्यात यावा आणि आरोग्याधिकारी यांनी मला उत्तर द्यावे की मोठे जनावरं जर मेले त्यांना उचलण्यासाठी यंत्रणा कोणती वापरता.

**आरोग्याधिकारी :-** आपली जी गाडी आहे त्याने आपण मेलेले कुत्रे,मांजर व लहान जे जनावरे असते ते आपण उचलतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया जर ॲक्सीडंट मध्ये एखादी म्हैस किंवा गाय मेली तर ती उचलायची कोणी ? आयुक्त साहेब यांना एक सुचना करा की जर एखादा मोठे जनावराचे काही झाले तर यांनी तात्काळ बांधकाम विभागाला संपर्क करुन त्यांचे ट्रॅक्टरने ते उचलावे.

**मा.सभापती :-** आता वाहन विभागाकडे जे आपले पिकअप व्हॅन आहे ते काय स्थिती आहे.

**आरोग्याधिकारी :-** बंदीस्त स्थितीत आहे.

**मा.सभापती :-** आता येथे असे एक सजेशन आहे की, मेलेले जनावरं उचलण्यासाठी बंद गाडी पाहिजे. तर त्याच्यातली दोन वाहन म्हणजे प्रभाग समिती क्र.१ आणि २ मिळुन एक वाहन आणि प्रभाग समिती क्र.३ आणि ४ मिळुन एक वाहन असे दोन गाड्या देऊ शकतो. आता आपल्याकडे ड्रायव्हर्स सुध्दा एक्सेस आहे. त्यांनाही अपॉईंटमेंट लगेच देऊ शकतो आणि शिफ्टमध्ये ते कामे आपण करु शकतो.

**आरोग्याधिकारी :-** दोन शिफ्टमध्ये ते काम आपण करु.

**मा.सभापती :-** आता निर्णय आपण असा घेतलेला आहे की दोन ऐवजी चार कर्मचारी करण्यात यावे म्हणजे प्रत्येक प्रभाग समितीला एक कर्मचारी असेल आणि जर एखादा कर्मचारी रजेवर असेल तर लगेच इकडच मनुष्यबळ तेथे वापरता येईल. आणि त्यांना दोन पिकअप वाहने आपण देऊ शकतो ड्रायव्हरसहीत.

**श्री.सुनिल खडके :-** मागच्या मिटींग मध्येपण हा विषय झाला होता की, प्रत्येक प्रभाग समितीला एक कर्मचारी द्यायचे परंतु आता पर्यंत काही झालेलं नाही. हे जे लोकं आहे काही काम करत नाही शहरामध्ये. या लोकांना जे आपण मानधन देतो खुप कमी देतो. जर यांना कायम स्वरुपी आपण सेवेत समावुन घेत असले तर त्यांच्यावर उपकार होईल.

**मा.आयुक्त :-** ही चर्चा झाली होती. मला ही आठवतं पण का वाढविले नाही. उत्तर द्या पाटील साहेब.

**आरोग्याधिकारी :-** त्यावेळेस आरोग्याधिकारी मी नव्हतो.

**मा.आयुक्त :-** गेल्या वर्षी मी नव्हतो. अधिकाऱ्यानी किंवा कर्मचाऱ्यानी मी नव्हतो असे उत्तर कधीही कोणालाही द्यायचे नाही. आपण ज्या पदावर असतो त्याची मागची आणि पुढची सर्वस्वी जबाबदारी आपली असते.आता ही सुचना चांगली आहे. आपल्याकडे वाहने आहे. पडुन आहे ड्रायव्हर जादा आहेत. जी कामे आपण करायला पाहिजे ती कामे नगरसेवक सुचविता आहे. तर ती ताबडतोब करा.

**श्री.दिलीप पोकळे :-** हे जे कर्मचारी जनावरे उचलता यांच्यासाठी आपण काय सुविधा पुरविता. त्यांची काय पध्दत आहे. तिथं ते नशा केल्या शिवाय जनावर उचलु शकत नाही.

**मा.आयुक्त :-** आता हे जे कर्मचारी आहे यांना आपण ठोक मानधन देतो आणि त्यांच्या सेफ्टीबाबत उपायुक्तांनी व्यक्तीश: लक्ष द्यावं.

**श्री.सुनिल खडके :-** हॅण्डग्लोज व गम बुट द्या.

**मा.आयुक्त :-** मी उद्याच्या उद्या हे सर्व देण्याची व्यवस्था करतो पण मला फक्त अशौरटी द्या की त्या वस्तु वापरली जातील.

**श्री.विष्णु भंगाळे :-** जर वार्डात साफसफाई होत नसेल तर हे उपायुक्त व अधिकारी यांचे काम आहे साहेब हे काही नगरसेवकांचे काम नाही. आता तुम्ही सांगितले की, जे कामे कर्मचाऱ्यांचे आहे ते नगरसेवक सांगता. गटार जर साफ होत नाही. तर ते आम्ही सांगणे व त्यानंतर साफसफाईचे कामे जळगांवात होणे असे नाही. त्यासाठी अधिकारी आहेत आणि त्या खाली कर्मचारी आहेत. त्यांच्यावर जबाबदारी जर टाकलीतर ते करतील.

मा.आयुक्त :- जबाबदारी दिलेली आहे, सांगण्याची गरजच नाही. कोणी ही जाता जाता जर कोणी उजव्या बाजुने जात असेल तर तो सांगेल तुम्ही सांगितले म्हणुन डाव्या बाजुने गेलो, फक्त निष्काळजीपणामुळे हे होत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब एक गोष्ट लक्षात आणुन देतो आपण आता सांगितले की, ते युज होईल का ?

मा.आयुक्त :- हो घातलेले आहे. पुणे महापालिकेला अशी कन्सेप्ट आहे आणि त्यांनी त्यांच्या स्वखर्चाने ते करुन घेतले आहे महानगरपालिकेच्या खर्चाने त्यांनी केलेले नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे करीता मानधनावरील मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांची उपायुक्त मनपा जळगांव यांचे आदेश क्र. जा.क्र./आस्था/३३०/२०१९ दि.१३/०६/२०१९ नुसार दि.२५/०२/२०१९ ते सहा महिन्याच्या कालावधी करीता सदर कर्मचाऱ्यांकडुन दैनंदिन मेलेली जनावरे उचलणेचे काम करुन घेण्यात येत आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्रं.१०९ दि.२०/०६/२०१९ नुसार जा.क्र./आस्था/५३६/ दि.२३/०७/२०१९ अन्वये दरमहा रु.१४,०००/- (माहे जून २०१९ पासून) अदा करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. मेलेले जनावरे उचलणेचे काम करणारे सफाई कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे हे गेल्या १५ ते १६ वर्षापासुन शहरातील मृत जनावरे उचलणेचे काम करीत आहेत.

सदरचे गलीच्छ काम करणेस कोणतेही कामगार तयार होत नसल्याने अत्यावश्यक सेवेची निकड लक्षात घेता स्थायी समिती ठराव क्र.१०९ दि.२०/०६/२०१९ अन्वये श्री. अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे सदर मानसेवी कामगार यांना दरमहा रु.१४,०००/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर कर्मचारी यांची नियुक्ती दि.२५/०२/२०१९ पासुन सहा महिने करिता केलेली असून त्यांची मुदत दि.२४/०८/२०१९ ला संपलेली असलेने पुर्वीच्या नियुक्ती मध्ये 2 दिवसांचा खंड देवुन दि.२७/०८/२०१९ पासुन नव्याने दरमहा रु.१४,०००/- प्रमाणे सहा (६) महिनेच्या कालावधीसाठी नियुक्ती देणेस व सदर कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.१,६८,०००/- ला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे कामी त्यांची विल्हेवाट लावणे कामी उक्त नमूद दोन्ही मानसेवी कामगार व्यतिरिक्त अजुन दोन नविन कामगार नियुक्त करावेत. प्रभाग समिती क्रं. १ ते ४ याठिकाणी प्रभाग समितीनिहाय एक याप्रमाणे कामगार यांना नियुक्त करुन मेलेली जनावरे उचलणे व त्यांची विल्हेवाट लावणे कामी प्रभाग समिती क्रं. १ व २ यांचे करिता संयुक्त एक पिकअप व्हॅन तसेच प्रभाग समिती क्रं. ३ व ४ यांचे करिता संयुक्त एक पिकअप व्हॅन वाहन चालकासह उपलब्ध करुन दयावे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव:- विषय क्र. ७)** सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी करणे कामी स्थानिक कर सल्लागार नियुक्ती करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** साहेब या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.

**मा.सभापती :-** या विषयाची माहिती अवगत करावे. काय विषय आहे सर्वांना समजु द्या.

**मुख्यलेखापरिक्षक :-** सन्मा.सभापती महोदया आणि सभागृह हा विषय दुहेरी नोंद पध्दतीने आपली जी लेखणी सांगितली गेलेली आहे त्या बद्दल हा विषय आहे. या मध्ये २७ नोव्हेंबर २०११ मध्ये संबंधीत मक्तेदार एस.एम.लोढा कंपनीला याचा कंत्राट दिलेला होता. आणि मक्तेदारानी दुहेरी नोंद करुन लेखांकन गव्हर्नमेंटला पाठविणेचे आदेश दिलेले होते. या मक्त्यानुसार आपण त्यांना दुहेरी नोंद करणेबाबत आदेश दिलेले होते. परंतु एन एम ए एम या

पध्दतीने करणे अपेक्षित असतं तर त्यांनी डायरेक्ट लाईन ए आर पी या पध्दतीने ठेवले. ते ठेवले सन २०११ पासुन तर आज रोजी पर्यंत तर आमच त्यांना हे म्हणणं आहे की ही आऊंटडेटेड पध्दत अकाऊंटींग डाटा ठेवण्याचा. या पध्दतीने आपल्याला जर काही सुधारणा करायची असेल तर National Municipal Accounting Manual २००४ यांनी दिलेल्या गाईडलाईन्स नुसार सुधारणा करणे आवश्यक आहे. मी त्यांच्याशी चर्चा करुन त्यांचा लेखी खुलासा घेऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेला आहे. सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० यापुर्वीच्या बाबतीमध्ये मी भाष्य करणार नाही. परंतु सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० मध्ये गव्हर्नमेंटने जे निश्चित करुन दिलेले धोरणं आहेत. एन एम ए एम या पध्दती प्रमाणेच करण्याच श्री.एम.एम.लोढा यांना देण्याच आपण ठरविले आहे. मा.स्थायी समितीला विनंती की प्रस्तावाला अनुमोदन द्याव.

**मा.सभापती :-** प्रस्तावास मान्यता देणेस हरकत नाही. परंतु ते एन एम ए एम या सॉफ्टवेअर पध्दतीनेच ते झाल पाहिजे. आणि सन २०१८-१९ च राहिलेल काम व सन २०१९-२० या चालु वर्षाच काम मुख्यलेखा परिक्षक यांनी त्यांच्याकडुन करुन घ्याव. तर प्रशासनाच्या प्रस्तावाला मंजुरी देणेस हरकत नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी करणेकामी स्थानिक कर सल्लागार एस.एस.लोढा अण्ड असोशिएटस् यांना स्थायी समिती ठराव क्रं.८८५ दि.२०/०४/२०१८ अन्वये दि.२०/०४/२०१९ अखेर दरमहा रु.१,०७,०००/- या दराने मुदतवाढ देणेत आलेली होती. त्यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५/२/२ अन्वये एस.एस.लोढा अण्ड असोशिएटस् यांना एन एम ए एम स्वॉफ्टवेअर नुसार व्दिनोंद लेखांकनासाठी दि.२२/०४/२०१९ ते दि.२१/०४/२०२० अखेर १ वर्षाकरिता मुदतवाढ मासिक मंजुर दराने रु.१,०७,०००/- दरमहा प्रमाणे खालील अटी-शर्तीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने कर सल्लागार यांचेकडून सन २०१८-१९ चे राहीलेले काम एन एम ए एम स्वॉफ्टवेअर मध्ये पुर्ण करुन घ्यावे. व सन २०१९-२० यावर्षातील संपुर्ण काम एन एम ए एम स्वॉफ्टवेअर मध्ये पुर्ण करुन घ्यावे. तसेच कर सल्लागार यांनी अर्थ विभागाकडील (४) चार कर्मचारी प्रशिक्षीत करुन दयावेत.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :- बालाणी भगतराम रावलमल**

**नगरसचिव:- विषय क्र. ८)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मधिल स्थायी समितीचे कामकाज संबंधीत तरतूदी नुसार स्थायी समितीची सभा आठवडयातून एकदा घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ मध्ये महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज करणेबाबतचे नियम नमूद केलेले आहेत. सदर नियमांतील कलम ३ मध्ये स्थायी समितीच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतूदी नमूद केलेल्या आहेत. कलम ३ अ नुसार स्थायी समितीची सभा आठवडयातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्यवेळी भरवण्यात आली पाहीजे अशी तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार सभा घेणे आवश्यक आहे. तरी स्थायी समितीची सभा प्रत्येक शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता भरविण्यात यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ९) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.**

**श्री.विष्णू भंगाळे :-** एस.एम.आय.टी कॉलेज कडुन शाहुनगर पावेतोच्या रोडची सुविधा होणार आहे की, शाहु नगरच्या कॉर्नरवर सुध्दा तिथे रोडची परिस्थिती अशी आहे की आता रोज आम्हाला फोन येतात पण आम्ही नागरीक आम्हाला विचारतात की रोड कधी सुधारेल आणि गटारीचा जो प्रश्न आहे तो तर त्यालाही मार्गी लावायला पाहीजे त्याबाबतीत एक सांगु ईच्छितो की, सभापती महोदय मागील काळात आपण सांगीतले होते की, विषय संपल्यानंतर आपण बोलाल या विषयांवर.

**मा.सभापती :-** या विषयी माझी थोडीशी ही सुचना द्यायची आहे की मक्तेदाराला हे बंधनकारक करायच आहे की प्रत्येक कामाच्या ठिकाणी त्या गोष्टीच कोणत्या निधीतुन काम होत आहे हि सगळी डिटेंल्स त्या कोणशिलेवर आली पाहीजे की जो रेकॉर्ड आपल्याला लागणार आहे हे ॲग्रीमेंट करतांना बंधनकारक करावं, नगरसेवकांची नावं सुध्दा त्याच्यामध्ये घ्यावीत. थोडसं आपल्याला काही बोलायचे असेल तर आपण बोलु शकता.

**श्री.विष्णू भंगाळे :-** नगरसेवक असेल किंवा आमदार असेल जे काही ओपन किंवा अंडरग्रांऊंड केलेले आहेत ते बंद करावेत जेणेकरून अडीअडचंणींना खुप मोठया प्रमाणावर तोंड द्यावे लागतं आहे. येथेच मागच्याच बाजुला खिडकीमधुन आपण बघीतले तर ते दिसतील ईतके मोठे बोगदे आहेत त्यात जर चुकुन कुणी पडला तर तो दिसणार नाही जर कधी आजुबाजुला कोणी नसले तर आणि कधीपासुनच ते निवडणुकीच्या आधीपासुन ओपन आहेत.

**मा.आयुक्त :-** भोळे साहेब आपल्या इंजिनियरला सांगा आपण पुढच्या वर्षीही करू पण जे आहे ते सांगा.

**श्री.सुनिल भोळे :-** सर आपण यापुर्वी सर्व क्लोज केलेले आहे एखादे वर्ष झाले असेल सर्व पॅक केले होते कारण काय आहे सर की खाली झालेले नारळ वगैरे जे असतात ना ते त्यात टाकतात सर म्हणून ते चोकअप होतात त्यामुळे आपण संपुर्ण बंद केलेले होते आणि काही राहीले असतील तर आपण बंद करू.

**श्री.सुनिल खडके :-** बऱ्याच ठिकाणी खड्डे पडलेले आहेत आणि तिथे बरेच लोक पडलेले आहेत पाण्याचे जे व्हॉल्व आहेत त्या ठिकाणी तर त्याठिकाणी सुध्दा काही ना काही सुविधा करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , आयुक्त साहेब मागील मिटींगमध्ये कचऱ्यावरती विषय केला होता त्याचा आढावा सुध्दा मी आयुक्त साहेबांपुढे मांडला होता माझ्या प्रभागात या विषयावर मी दंडवते साहेबांबरोबर बसुन त्यावर नियोजन केल परंतु त्यावर आजपर्यंत समाधानकारक काम झालेल नाही दरवेळी मी त्यांना सांगत असतो ते हो ला हो लावतात या दोन तीन दिवसांमध्ये आमचा प्रभाग आता स्वच्छ दिसतोय असेल तर हो आणि नसला तर तसे म्हणु साहेब आम्ही आज ज्या तारखेला आहे परंतु असाच नेहमी असला पाहीजे. आपण टेंडर देतांना दुप्पट निधी दिलेला आहे या प्रभाग क्रं.५ मध्ये ११० ते ११५ कर्मचारी होते तर मग त्यांना आता कमी करण्याचे कारण काय याचा एक मुद्दा असा की आपण टेंडर डबल ने दिलेल आहे आणि कर्मचारी कमी करतोय तर अस्वच्छता होणारच आहे साहेब. तुम्ही सांगा आमदार येतील महापौर येतील आणि ते सांगत असतील मग जर स्वच्छ होत असेल तर हे चुकीचे आहे. तुम्ही या गोष्टीकडे लक्ष दिल पाहिजे. आम्ही दररोज बोलतो हा मार्केट एरिया आहे रोजच्या रोज घान तयार होते. माणुस दुकान साफ केल्यानंतर कचरा कुठे टाकणार या गोष्टीची जबाबदारी आपण फिक्स करावी. जेणे करुन स्वच्छता राहील. दररोज चार ते पाच स्पॉटसाठी आम्हाला स्वत: फोन करावे लागता.फोटो येतात आता नागरीक हुशार झालेले आहे ते फोटो काढुन व्हाटसअप वर टाकतात. मी मागे आयुक्त साहेबांना ३० ऑक्टोबरला माती भरण्याचा एक फोटो टाकलेला आहे. आणि त्या खाली लिहिले की, यावर कार्यवाही करा. मी होतो विरोधीपक्ष नेते होते शिवसेनेचे प्रमुख श्री. शरद तायडे होते. आम्ही असतांना अशी अडचण आली. अक्षरशा पुर्णपणे माती भरलेली होती. साहेब याच्यावर कार्यवाही काय झाली. मागे ही झालं होतं आता ही झालेले आहे. शाहुनगर ट्रॅफिक गार्डनच्या बाजुला जी ओपनस्पेस आहे तेथील माती कोरुन घेऊन गेले आपण जे.सी.बी. दिले मनपाची त्याची काही नोंद आहे का आपल्याकडे. आपला जे.सी.बी. ठेकेदाराला देऊन तेथील माती उचलली. जळगांव शहर स्वच्छ करण्याची आपली जबाबदारी आहे आणि माती काढण्यासाठी आपण मनपाचा जे.सी.बी. देत आहात.

**आरोग्याधिकारी :-** आरोग्याचा जे.सी.बी. फक्त कचरा भरतो, आणि जर रविवारी कोणी अस केल असेल त्या भागातील सॅनेटरी इन्स्पेक्टर आणि कर्मचारी त्यांच्यावर १००% कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** साहेब जर माती उचलायची असेल तर त्यासाठी एक टेंडर काढा वेगळी जबाबदारी टाका.कचऱ्याच्या माध्यमातुन तो घेऊन जातो आणि माती टाकतो. अक्षरश: ती माती झाकली जाते याचे सुध्दा व्हिडिओ रेकॉर्डींग आहे साहेब.माती टाकल्यावर त्याच्यावर काड्या झाडे झुडुपे टाकले जातात. त्याच्यावर काय कार्यवाही झाली मी माहिती मागीतली होती पण माहिती मिळाली नाही. आधी निम्मे खर्च लागुन जळगांव शहर चांगल्या प्रकारे स्वच्छ होत होतं. डबल खर्च होऊन आता ही तिच परिस्थिती आहे. कचरा उचलला जात नाही. आणि उपमहापौरांनी पत्र दिल्यानंतर की पैसा देऊ नये तरी ही त्याचे बिल काढले जाते. बाकीच्या सदस्यांनी काय कराव. याला आपण गांभिर्याने घ्याव. आमची एकच इच्छा आहे जळगांव शहर स्वच्छ आणि सुंदर व्हाव या दृष्टीने प्रयत्न

करावा. रस्त्यावर खड्डे झालेले आहे पाऊसामध्ये माणुस घसरतो. माझी एक विनंती आहे साहेब माझ्या वार्ड क्र.५ मध्ये निम्म्या खर्चाचे डबल झाले असतांना ९० कर्मचारी आता देत आहे. याच्या आधी १११ होते याचा नेमक कारण काय ? आणि १०% दररोज रजेवर असतात साहेब लोकं. याच्यात मोठ मोठी जागा आहे बी.जे. मार्केट आहे फुले मार्केट आहे. तर लोकं कमी करण्याच कारण काय.

**आरोग्याधिकारी :-** जेव्हा शहरामध्ये माणसं दिले तेव्हा तुमच्याकडे ५-१० जास्त माणसं होते. आज आपल्याला ८२ माणसं दिलेले आहे. त्यामध्ये स्टाफ पैकी घंडागाडी, ट्रॅक्टर, डंपर याच्यावर मजुर लावले आपण. आता हे जे ८२ लोक आहे हे पुर्णपणे गटारी साफसफाई आणि झाडु मारण्यासाठी असतात काही आजारी असतात.

**श्री.विष्णू भंगाळे :-** कधीचे बोलताहेत साहेब या प्रभाग क्रं. ५ विषयी लोकांची अडचण आहे आणि साफसफाई होत नाही त्याला काय करणार आपले हे टेंडर डबल ने दिलेले असतांना त्यांना वाहने दिले आहेत त्याची नोंद आहे का आणि देण्याची गरज काय पडली आहे त्या ठेकेदाराला तो लावेल वाहने भाडयाने मनपाचे काढुन अधिक्षक साहेब वाहन दिले होते काय घंटागाडयांचा विषय नाही मी दंडवते साहेबांना विचारतोय दिले होते का.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** आपण त्यांना वाहने दिली होती आपण सदर काम सुरू करण्यापर्वीच वाहने दिली होती काम सुरू झाल्यानंतर त्याच्या कामातल्या ज्याकाही त्रुटया होत्या त्याला तो कचरा नियंत्राणात आणता आला नव्हता आणि गणपतीचा जो सिझन होता त्याच्यात दोन दिवसांत आम्ही हा निर्णय घेतला की तो जर काम पुर्ण क्षमतेने करीत नसेल तर आमच्या कडे पुर्वीची जी यंत्रणा होती म्हणजे जे.सी.बी , ट्रक्टर , लोडर तर ती यंत्रणा आम्ही काही भागांमध्ये वापरली होती त्याला तस आपण पत्रही दिले होते मा.आयुक्त साहेबांची तशी मंजुरीही घेतली होती आणि त्याचा जो काही खर्च आहे तो त्याच्या कडुन वसुल करण्यात येईल असे पत्र दिलेले होते आणि त्याप्रमाणे खर्च जो आहे तो वसुल केला जाईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हा जो खर्च आहे ३५ दिवसांचा म्हणजे १५ आणि २० हा जो खर्च आहे १९/०९ म्हणजे एका महिन्यामध्ये ७६१२९१२ रू. दंड हा किती योग्य आहे म्हणजे मला त्याच्याकडुन काम करून घेणे गरजेचे आहे आणि दंड केला म्हणुन सांगुन मोकळे होवुन जातात दंडाचा काही हे नाहीये परंतु त्याच्याकडुन कामे झाली पाहीजे.

**मा.आयुक्त :-** याच्या संदर्भात त्याच्यामध्ये रॅम्प तयार करणे आणि लोडर मशीन देणे हा विषय आपला होता आणि तो प्रोसेस मध्ये आहे त्यामुळे तो परिणाम झालेला आहे त्यामुळे ते आता प्रोसेस मध्ये आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मला आता माझ्या प्रभागामध्ये माणस वाढवुन मिळतील का मी तुम्हाला माणस देतो कुठेकुठे काय काय असत खुशाल डॉ. डायरेक्ट हे म्हणतात की मी देवु शकत नाही आणि काही काही एरीया मध्ये साफसफाई होत नाहीये त्याची जबाबदारी काय आहे. माझ्याकडे सर्वी यादी आहे कोणता कर्मचारी आलेला आहे कोण कुठे काम करतो. आणि आधीचे स्पॉट काय होते. याचा आढधंदेपणा आहे साहेब हे माझ्या घरासमोरची लेडीज काढुन टाकली त्याच काय ? मग तोंड कोण देणार तुम्ही येणार का डॉक्टर शरद तायडेच्या घरासमोरची लेडीज दोन महिन्यापासुन काढली होती उपायुक्त महोदय तुम्ही परवा तेथे लेडीज दिली. मग आम्ही काय रावन्या करायच्या का त्या महिलांच्या की ताई हा रोड झाडुन घेजा सकाळी जातांना मला म्हणायचे आहे ९० काय तुम्ही ८० लोकांवर काम करा प्रभाग स्वच्छ झाला पाहिजे. आणि इतकच जर चांगला काम ५० लोकांवर करत असाल तर तुमचा सत्कार महापालिकेच्या १७ मजली वरती ठेवु. फक्त आढधंदेपणा करायचा नाही. हा नडतो तो नडतो म्हणुन करायच नाही. आमचा विश्वास आहे अरोग्य निरिक्षक असो किंवा कर्मचारी असो तो काम करतो व्हॉटसअपवर फोटो पाठवतो. तुम्ही फक्त त्याच्या नाराजी साठी आमच्यावर का रोष काढता पब्लीक आम्हाला दोष देते. किती दिवसापासुन माझ्या घरासमोरचा माणुस काढला आज मी बोलत आहे. किती दिवसापासुन काढला आहे उपायुक्त साहेब सांगा मला तुम्ही. दिवस नाही महिने किती झाले.

**आरोग्य विभाग उपायुक्त :-** तुमच्या वार्डात मी स्वत: १०-१२ वेळा आलो, आरोग्य निरिक्षक असतील सॅनेटरी इन्स्पेक्टर असतील किंवा सी.एस.आय. असतील. मी एकदा आपल्यालाही बोललो की कांबळे म्हणुन जे सॅनेटरी इन्स्पेक्टर आहे. वारंवार सुचना करुन ही त्यांनी त्यांच्या वार्डच नियोजन केलेल नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपण कांबळेच्या बाबतीत म्हणत आहे आम्ही चारीही लोकं त्या कांबळेच्या बाबतीत समाधानी आहोत. चार नगरसेवकांपैकी एकाच ही नांव येणार नाही त्या कर्मचारीला काढुन टाका. परंतु ज्यानी लाईन लावलेली आहे आम्हाला माहित आहे. आज परिस्थिती अशी आहे. आयुक्त महोदय काम सांगितल त्या सॅनेटरी इन्स्पेक्टरला त्या ठेकेदाराला सांगाव लागते आणि मग तो काम करतो. आधी आपल्या मनपात तसे नव्हते. आपण काम सांगितले की लगेच होत होतं. त्यामुळे ते अॅडजस्ट करुन घेता जो माणुस अॅडजेस्ट करुन घेतो त्यालाच तुम्ही टारगेट करत असाल तर बाकीच्याचा विचार करावा लागेल. जो चांगला आहे चांगलाच म्हटलेला आहे. तो सॅनेटरी इन्स्पेक्टर काय तो मजुर होता. कामासाठी त्याला प्रमोटेड दिलेले आहे. तुम्ही त्याच रिकॉर्ड वार्डातला घ्या आपल्या अधिकाऱ्यांकडून घेऊ नका. मी तुम्हाला सांगतो वार्डामध्ये सद्या फिरवा तुम्ही. आम्हाला काही अडचण आली तर आम्ही त्याला फोन करतो तो लगेच कामे करतो. तुम्हाला फोन करायचे का तुम्ही उबगुन जाल.

**आरोग्य विभाग उपायुक्त :-** मी स्वत: आपल्या वार्डात १०-१२ वेळा आलो आणि घंटागाडीच नियोजन करणेसाठी मी रात्री ९.३० -१०.०० पर्यंत थांबलेलो आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** साहेब तुम्ही घंटागाडीच नियोजन केलेल आहे. भवानी पेठ असेल राधाकिसन नगर असेल गांधी नगर असेल ओंकार नगर असेल तुम्ही चला मी ही चलतो मी आयुक्त साहेबांना विनंती करत आहे. आपण स्वत: जाऊ नागरीकांना बोलवु एका ठिकाणी आणि त्यांना विचारु केव्हा त्या घंटागाड्या व्यवस्थीत यायला लागल्या. त्यांचा टाईमींगच फिक्स नव्हता. आम्हाला थांबवुन सांगाव लागत होत. हे काही मोठ गाव नाही जर ती गाडी चालली गेली तर ते डायरेक्ट रोडावरती कचरा टाकुन देता. किती दिवस तर हेच चाललं की गाडीला घंटा न होता हॉर्न नाही होते म्हणुन मी निघुन गेलो.

**आरोग्य विभाग उपायुक्त :-** वार्ड क्र.५ मध्ये भाजीमंडी पडते आणि त्यांची संख्या खुप मोठया प्रमाणात आहे. आणि खुप मोठे मोठे घर आहे. या सगळयांचा अभ्यास करुन त्यांची सोईची घंटागाडीची वेळ ठरवुन देणे गरजेचे आहे. दुकानदारांना जर सकाळी ९.३० ते १०.३० ची घंटागाडी दिली. तर १०..०० वाजता जे दुकाने उघडतात त्यांचा कचरा बरोबर घंटागाडीत जमा होईल. हे नियोजन आम्ही केल आणि तो अनसकसेस झाल तर आम्ही रिटर्न घेऊ. परंतु अंमलबजावणी करायला हरकत नाही. सायंकाळी ४.०० ते ६.०० परत घंटागाडी जर गेली तर चांगले होईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** साहेब तुम्ही जर प्रामाणिकपणे क ाम करत असाल तरी ही तुम्ही स्वत: जाऊन पहा. इतके करुन ही का वार्डाची तक्रारी येत आहे.

**आरोग्य विभाग उपायुक्त :-** कांबळे आहेत का किंवा नेमाडे, जर ते दोघी आता समोर राहिले असते तर त्यांनी दोघांनी कबुल केलं असतं. ज्या काही सुचना केल्या त्याची अंमलबजावणी झाली नाही.

**मा.आयुक्त :-** माझा विषय लक्षात आला.

**मा.सभापती :-** जर कांबळे बद्दलचा विषय आहे. मी सांगु इच्छिते की माझा मागच्या पंचवार्षिक चा जो अनुभव आहे की कांबळे खुप कार्यक्षम ए.एस.आय. आहे. मागे जे ए.एस.आय. लोकांचे सत्कार झाले होते. त्यापैकी ते एक आहे.

**आरोग्य विभाग उपायुक्त :-** त्यांना वार्डाचा प्लॅन करण्यासाठी केव्हाचा दिलेला आहे. परंतु मधल्या अडीच महिन्याच्या कालावधीत कांबळे अनुभवी आहेत. ते मला मिटींग मध्येही सांगतात की हे मी पहिल्यांदा करत आहे. माझा वार्ड मी धुर मुक्त पहिल्यांदा करेल कचरा मुक्त पहिल्यांदा करेल. परंतु ग्राऊंड लेवलला जर पाहिले तर त्यांची अंमलबजावणी खुप कमी आहे. आता शनिपेठच्या काही महिला आल्या होत्या, छोटे छोटे प्रश्न होते त्यांचे, दुसऱ्या दिवशी आम्ही तेथे साईटव्हिजीटला गेले असता, त्याची अंमलबजावणी सुध्दा त्यांनी केलेली नव्हती.

**मा.सभापती :-** हे माझा ही अनुभव आहे की कांबळे दोन तासाच्या आत प्रॉबलम सॉल्व्ह करतात.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आयुक्त साहेब मी तुम्हाला क्लिप दिली होती वॉटर ड्रेनेजच्या बाबतीत त्यावर काही कार्यवाही केली का ?

**मा.आयुक्त :-** याबाबत अजुन एक तक्रार श्री.पोकळेंची ही आहे तर संबंधीतांवर कार्यवाही होईल.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आता दोन ते तीन महिने झाले आहे. आता १६ तारखेपासुन माझ्या वार्डाचा ३ रा महिना संपेल. आज सकाळी आरोग्य निरिक्षक होते एस.आय होते मिटींगला येण्यापुर्वी कचरा उचलण्यासाठी मी ट्रॅक्टर मागवितो, डंपर मागविता पण ११.०० वाजेपर्यंत ते काही आले नाही. कचरा जसाचा तसा आहे. परवा पासुन मी तुम्हाला रोज नोंद देणार की, झाडु काम झाले की नाही, गटार काम झाले की नाही. घंटागाड्या आल्या की नाही. परवा पासुन देणार मी तिसरा महिना चालु होत आहे माझ्या माहितीप्रमाणे. आता पदाधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या मिटींगमध्ये काय झाले ते ते करतील. तो त्यांचा भाग आहे. आपले ८ ट्रॅक्टर म्हणा, जे.सी.बी. म्हणा, लोडर म्हणा किती दिवस वापरले, माझ्या माहिती प्रमाणे तुम्ही दिड दोन महिने ते वापरले, तुम्ही हे बिलामधुन दिड महिन्याची रक्कम २ लाख ७४ हजार त्यातुन वजा झालेली आहे. रु.२ लाख ७४ हजार वजा करतांना आज मक्तेदाराने एक ट्रॅक्टर २० हजार रुपये महिन्याप्रमाणे लावले आहे.हे तुम्हालाही माहिती आहे त्यात त्याचे डिझेल वेगळे आहे मग आपल्या ८ ट्रक्टरचे महिन्याचे भाडे किती होते आणि तुम्ही त्याचे कोणत्या याच्याने वजा केले.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** जे पैसे वजा केलेले आहे याच्यात काही नियोजन होणार असेल तर ते आम्ही नक्की करू आता त्या नियोजनाकरीता वाहन विभागाकडे ती नस्ती दिलेली आहे की याच्याकडुन आम्ही जी रक्कम वसुल केलेली आहे याच्या वापराच्या संदर्भामध्ये जर समजा आता कमी वसुल झाली तर ती रक्कम आम्ही पुढच्या बिलातुन वसुल करू.

**श्री.नितीन बरडे :-** नाही पण हा हिशोब कुठल्या पध्दतीने केला आहे साहेब आमच्या डोक्यात काय कल्पना येते दिड महिन्यात तुम्ही २ लाख ७४ हजार वजा करताय महिन्याच नुसते ट्रक्टरचे भाड केलं १लाख ६० हजार नुसते भाडे जाते आणि रोज समजा त्या ट्रॅक्टरला ५ लिटर डिझेल याप्रमाणे जर केले तर ८४ हजाराचे डिझेल हा एक महिन्याचा हिशोब झाला तो आपल्याला देतो आहे त्याप्रमाणे.

**मा.आयुक्त :-** आपण जी आपली वाहने देतो ना तो विचार करून देत नाही शासनाच्या याच्याबाबत गाईडलाईन्स आहेत त्या वाहनाचे आयुष्य त्या वाहनाचे खरेदीचे वर्ष आणि त्याच्याप्रमाणे जे भाडे येईल ते भाडे त्याने भरावे.

**श्री.नितीन बरडे :-** नाही साहेब याच्या पहिले जो मक्ता आहे याचे भाडे काय काढले आहे शासनाच्या प्रमाणे ते विचारा एका घंटागाडीचे भाडे ३ हजार रू. रोज होते शासनाचे रेट आहे लोडर चे भाडे काय होते मागे ते विचारून घ्या याच्यात हा फरक आहे त्यामुळे आम्हाला याच्यात शंका येते ना की याच्या भ्रष्टाचार झाला त्यानंतर आपले जे डंपर वापरले गेले आपले डंपर भरतोय आपले काही डंपर छोटे आहेत काही मोठे आहेत हे समोर आहे ९७७८ नंबरचे ९३७७ नंबर चे १३७८ नंबरचे असे काही डंपर आहेत आपले रेती म्हणा मुरूम म्हणा याला शासनाची पासींग साढेपाच टनाची आहे आणि त्या छोटया डंपरला ४ टनाची आहे हे तुमच्या वजनाचे बिल माझ्याकडे आहेत एका डंपर मध्ये ९७८५ किलो वजन आहे म्हणजे ९ टनाच्या वर आहे म्हणजे मी परिवहन मंडळाकडे तक्रार करू का साहेब ओव्हरलोड वापरले म्हणून तुम्ही.

श्री.विष्णू भंगाळे :- म्हणजे एवढा बदल कसा काय झाला.

**श्री.नितीन बरडे :-** नाही नाही ९ टनाचे म्हणजे ९७८५ किलो हे कोणते डंपर वाले भरतात तुम्ही दाखवा मी उद्या परिवहन मंडळाकडे याची तक्रार करू का तुमचे हे सर्व लेखी स्वरूपात आहे हे पुन्हा केलेले आहे एकही डंपर नाहीये की ६ हजार च्या खाली आलेले आहे काही डंपर २ हजार २५०० किलोचे आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** भरून घ्या नंतर त्याचे वजन घ्या.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब पण हे वजनाचे काय**.**

**माआयुक्त सो‍ा :-** नाही त्यांना आपल्याला वेईंग मशीन दयायची आहे तीन वेईंग मशीन आपल्याला द्यायच्या आहेत आणि तो विषय प्रोसेस मध्ये आहे आणि पुढच्या मिटींगला येईल तो विषय.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब ९५०० हजार टनाचे झाले रु.७५००/- मिनिमम

**मा.आयुक्त :-** पाटील साहेब खुलासा करा, हे वजनाचा काय विषय आहे. जी वस्तुस्थिती आहे ती सांगा.

**श्री.नितीन बरडे :-** सर आर.टी.ओ.च्या पासींगनुसार रेती आणतो दोन ब्रास तीन ब्रास त्यालाही इतका नफा भेटत नसेल ७५०० रुपये डिजल त्याचा आहे माणुस त्याचा आहे फक्त डंपर आपला आहे. म्हणजे एक डंपर कचरा उचलण्याचे आपण त्याला ७५०० रुपये देत आहे.

**आरोग्याधिकारी :-** हा विषय आरोग्य निरिक्षक आणि सि.एस.आय. यांचा आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब माझ्याकडे तारखा आहे नोंद आहे.

**आरोग्याधिकारी :-** आम्ही दोघांना विचारणा करु आणि का भरला गेला नाही त्याचा खुलासा करुन त्यांच्यावर कार्यवाही करु.

**श्री.नितीन बरडे :-** माझ्या माहिती प्रमाणे जर फक्त जळगांव शहरातल्या तुम्ही झाडांच्या पत्ते, काडी व फांद्या इतके जरी तुम्ही उचलले तर जळगांव साफ दिसेल.

**मा.आयुक्त :-** आपण जे वाहने दिले असे लक्षात आले की खरंच ते कमी आहे. त्याच्यामुळे ती वाहने दिली आणि त्याप्रमाणे त्याचा जे काही योग्य भाड आहे शासन निर्णय प्रमाणे ते घेऊ. मग आपल्याला असा निर्णय घ्यायचा आहे का की, त्याला कुठलाही वाहन द्यायच नाही त्याच्या पध्दतीने त्याने कराव. फक्त घंटागाडया द्यायचे. असे ही आपल्याला करता येईल.

**श्री.नितीन बरडे :-** घंटागाडयांचा आम्ही सर्वानुमते मान्य केल. त्यानी प्रत्येक प्रभागात ट्रॅक्टर लावायला पाहिजे होते. आज माझ्या प्रभागात फक्त आठ दिवस झाले फक्त डंपर येत आहे. डंपर सर्व गल्ल्यांमध्ये जात नाही. आज तेथे ट्रॅक्टरच पाहिजे, माणसच पाहिजे. त्यानी माणस लावले आहे का ?

**मा.आयुक्त :-** आपली जी वाहने आहे त्या आपल्याला देता येत नाही. त्याला ते आपल्याला द्यावे लागतील आणि आपण भाडे वसुल कराव.

**श्री.नितीन बरडे :-** आपण त्यांना सर्वी यंत्रणा देत आहोत ते फक्त माणुस लावत आहे.

**मा.आयुक्त :-** या संदर्भात बऱ्याचपैकी चर्चा झालेली आहे सन्मा. विरोधीपक्ष नेते पण त्या ठिकाणी होते. संपुर्ण चर्चा झाली आहे काय नियोजन करायचे.

**श्री.नितीन बरडे :-** हे टिपरचे काय ?

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** साधारणता ५ टिपर त्यांचे चालु आहे. जे आपण करारनाम्यानुसार त्यांना हॅण्डओवर केलेले आहे. प्रत्येक टिपर वर नियंत्रण राहावे म्हणुन आम्ही टिपरवर एक मुख्य आरोग्य निरिक्षकाची नेमणुक केलेली आहे. एका मुख्य अरोग्य निरिक्षकांकडे एक एक टिपर दिलेला आहे काहींकडे दोन टिपर दिलेले आहे. आता ही काही जास्त वजनाची तक्रार आहे. त्याची आम्ही गंभीर दखल घेणार. ते टिपर मी स्वत: चेक करणार आहे रॅनडमली. पुर्वी मी असाच एक टिपर मी स्वत: रात्री ८.३० वाजता वजनकाट्यावर चेक केलेला आहे.त्याच्यानंतर तो वेळेच्या नंतर काम करत होता मी आयुक्त साहेबांशी बोललो की ही वाहतुक वेळेच्या नंतरची वाहतुकीवर आपले कर्मचारी नियंत्रण ठेवु शकत नाही ती वाहतुक त्याच वेळेस बंद केली आता जे काही वजन वाढतय म्हणजे आणि आपण लॉग बुक दिलेले आहे त्या बुकवर जे वजन वाढतय त्याच्या त्या लोकेशन ला बघतोय आणि कचऱ्याचे सर्वसाधारण स्वरूप काय होते की कागद होते, प्लास्टीक होते किंवा गटारचा माल होता याच्यावरून वजनाचा आपण अंदाज लावतोय की, हा जो

कचरा भरला कागद पुठठे भरले तर जर वजन ७ टन भरत असेल तर त्या टिपर मध्ये वेगळ काही असण्याची शक्यता येते आणि म्हणुन आम्ही हे रोज व्हेरीफीकेशन करणार शक्य झालेतर मी प्रशासन विभागाकडुन काही दिवसांनंतर मी व्हिजीलर्स स्पॉट ठरवुन घेणार आहे म्हणजे ते फक्त टिपर आणि काही प्रमाणात ट्रॅक्टरवर लक्ष देतील आणि मग याच्यावर नियंत्रण बसेल आणि ट्रॅक्टरमध्ये ॲव्हरेज कचऱ्याचे वजन किती भरतं २२०० किलो भरू शकतं आणि टिपर मध्ये बॉडीच्या टपापर्यंतच भरायला पाहीजे आणि तो ६ टनापर्यंतच जायला पाहीजे अश्या पध्दतीने आम्ही त्याच्यावर नियंत्रण नक्की मिळवु आणि उद्या स्पॉट व्हेरीफीकेशन वेगळे करणार आहे कारण आमच्याच आरोग्य विभागाचे कर्मचारी तपासणीला गेले तर ते योग्य होणार नाही कारण प्रशासनाकडुन मी किमान दोन कर्मचारी घेणार आहे .

**श्री.नितीन बरडे :-** कचरा उचलुन टिपर कुठे जाणार आहे.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** एक टिपर भरायला जर क्षमता असेल .

**श्री.नितीन बरडे :-** नाही लोडर मध्ये काय भरणार मग

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** नाही मी काय म्हणतोय आपला मुद्दा काय आहे की आपण दुसऱ्या महापालिकांमध्ये खुप मोठया प्रमाणात नियंत्रण मिळवलेल आहे मी आपल्या माहिती साठी सांगतो की पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये मी रोजचा १५० टन कचरा कमी केलेला होता १२५ टन त्याचा कचरा होता.

**श्री.नितीन बरडे :-** नाही मी काय म्हणतोय.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** नाही मी काय म्हणतोय मी गाडयांच वजनाचे जे टायमिंग आहे जर वजन काटयावर गाडी ११ वाजता गेली आणि खाली करायला ती ११.३० ला गेली आणि परत त्याच गाडीचे वजन जर १२.३० ला होत असेल तर ते चुकीचं आहे याचा अर्थ असा होतो की ती गाडी खाली केली गेलेली नाही हे रेकॉर्ड मी वेळेसह ठेवायला लावलेलं आहे आता याच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी हे रेकॉर्ड जरी क्रॉस चेक केलं तरी आपल्याला वजनावरती १०० टक्के नियंत्रण मिळवता येवु शकतं आणि पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये १५० टन कचऱ्याचे वजन कमी झाले परंतु कचरा तिथे वारंवार साचु लागला असे काही नव्हते वजन केव्हा झालय , गाडीत काय भरलय किती भरलय.

**श्री.नितीन बरडे :-** हया एका टीपरची दोन नोंद आहे ८ व ८.५ टनाची नोंद आहे.

**मा.उपायुक्त (आरोग्य) :-** आता मी लॅगबुक व सी.एस.आर. चेक करेल.

**मा.आयुक्त :-** आता पुढच्या वेळेस ॲवरेज चेक करुन आपल्या सह्यांनी ते करावा.

**श्री.नितीन बरडे :-** आठ दिवस आपले ट्रॅक्टर जळगांव शहरात जेवढया फांद्या पडलेल्या आहे आणि लोकांनी गवत काढुन बाहेर टाकलेले आहे. ते पहिले उचलायला लावा कारण काही कुंडयावर झाडांच्या मोठ मोठया फांद्या पडलेले आहे. ते पहिले उचलुन घ्या. आपल्या वाहनांमार्फत उचलुन घ्या.

**मा.आयुक्त :-** आपल्या ट्रॅक्टरने उचलुन घ्या.

**श्री.नितीन बरडे :-** सर आपले ट्रॅक्टर खड्डे बुजायला जाता. मुरुम भेटत नाही. कुठुन कुठुन आणता आपले लोकं.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब २७ फेब्रुवारी पासुन आता पुलाला ८-९ महिने झाले. तेथील जे ईलेक्ट्रीकल सप्लाय आहे ते नगरपालिका काढेल किंवा रेल्वे काढेल त्याच्यामुळे ते अडकलेल आहे. आता रेल्वे स्टेशनवाल्यांनी रेल्वे पुलाच्या इकडे आणि तिकडे एक एक बोर्ड लावलेला आहे. बिनाटिकीट आल्यास दंड होईल. आता शाळा सुरु होतील आणि शाळेचे मुले जातील. काही शिक्षक जातील त्यांना जर पकडले तर त्याचे जबाबदार कोण राहतील. आपण असा निर्णय घेतला होता की जो पर्यंत पुल बांधला जात नाही तो पर्यंत त्या लोकांना टिकीट मागितले जाणार नाही.

**मा.आयुक्त :-** या संदर्भात निर्णय आपण घेतलेला आहे. त्यांना दंड करणे योग्य नाही होणार.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कालच पकडले ४४ लोकं माझ्या वार्डातले.

**मा.आयुक्त :-** आम्ही डि.आर.एम. शी बोलु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही तितके बोलुन हा विषय मार्गी लावा. १८ महिन्याची मुदत दिलेली होती. आता काही ६ महिने मुदतवाढ दिलेली आहे. म्हणजेच २ वर्ष लागतील. कारण ते बी अण्ड सी वाले म्हणतात इकडुन आहे तिकडुन आहे. आम्ही शिवाजीनगर निवासी आहे आम्हाला त्रास होत आहे. तुम्ही पुलाच काम पहिले मार्गी लावा.

**मा.आयुक्त :-** मी शिवाजीनगर रहिवासी आहे.

**श्री.नितीन बरडे :-** किती मिटींग झाल्या. लेखापरिक्षणाचा अहवाल येत नाही. फायरचा अहवाल येत नाही. ते अहवाल यायलाच पाहिजे. आम्हाला ही माहिती पडायला पाहिजे. किती खर्च झाले आणि कुठे जमा झाले.

**नगरसचिव :-** त्या विभागाच्या एच.ओ.डी. नी अहवाल पाठवायला पाहिजे ही त्यांची जबाबदारी आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १७७ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे की,** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५२ दि.०७/०९/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण स.क्र.४१६/१ महानगरपालिका मालकीच्या ओपनस्पेसला (गट क्र.४१६/१पै/ओपनस्पेस) चेनलिंक फेन्सिंग करणे कामी मक्तेदार निखिल कृष्णराज पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ५.७५% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,९०,०८४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५४ दि.०९/०९/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१२ अंतर्गत मेहरुण स.क्र.४७८/१/१ टेलिफोन नगर येथे खुल्याजागेस संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार निखिल कृष्णराज पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ९.९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१०,६९,३२३/- मात्र खर्चाची संविदा.

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५५ दि.०९/०९/२०१९ अन्वये खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१४ सिटी स.क्र.४३३/१ ब मधील महानगरपालिकेच्या खुल्या भुखंडावर बांधण्यात आलेल्या सभागृहास संरक्षण भिंत (कंपाऊंड वॉल) तयार करणे कामी मक्तेदार निखिल कृष्णराज पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ५.७५% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.९,०५,३४३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.खा.श्री.ए.टी.(नाना) पाटील)

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५६ दि.०९/०९/२०१९ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.११ अंतर्गत म्युनिसिपल कॉलनी जवळ २० सिट्स सार्व.शौचालय बांधणे कामी मक्तेदार राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रकमेपेक्षा ०.२७% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२३,१५,८४५/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५७ दि.०९/०९/२०१९ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०६ अंतर्गत इंदिरानगर, शाहुनगर रोड जवळ १८ सिट्स महिलांकरीता सार्व.शौचालय बांधणे कामी मक्तेदार संदेश ज्ञानदेव टेकाडे यांचे निविदा रकमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,९४,६४८/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५८ दि.०९/०९/२०१९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१२ अंतर्गत सन्मीत्र कॉलनी स.नं.४७९/अ मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे व गेट बसविणे व प्रभाग क्र.१२ अंतर्गत मेहरुण स.नं.४८५/५ब लक्ष्मीनगर मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सिंग करुन गेट बसविणे कामी मक्तेदार निखिल कृष्णराज पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ९.९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१५,५४,७५८/- मात्र खर्चाची संविदा.

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५९ दि.०९/०९/२०१९ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१९-२० जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शिवाजी नगर मधील श्री.परदेशी यांचे घराजवळ २० सिट्स सार्व.शौचालय बांधणे कामी मक्तेदार जितेंद्र गणेश ठाकरे यांचे निविदा रकमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२३,२२,११५/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६० दि.०९/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोग अंतर्गतचा स्वच्छ भारत अभियाना करीता ५०% राखुन ठेवलेल्या निधीतुन जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१५ व १९ मेहरुण येथे सार्व.शौचालय दुरुस्ती करणे कामी मक्तेदार हेमंत अरुण नाईक यांचे निविदा रकमेपेक्षा ०.००१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.६,९९,६२३/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६२ दि.१३/०९/२०१९ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी लागणारा खर्च रक्कम रु.१०,७३,४६०/- + अंदाजे वाहतुक खर्च रक्कम रु.८४,७८८/- असा एकुण रक्कम रु.११,५८,२४८/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६३ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन मेहरुण स.नं.४६४/४ ब-५अ, ४६४/५ खुली जागा येथे पाणी व्यवस्थेकरीता पाण्याची टाकी उभारणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९९% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,८२,४४४/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६४ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.३ अंतर्गत जळगांव स.नं.६९/१ खुली जागेला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार स्वप्निल नरेंद्र

चौधरी यांचे निविदा रकमेपेक्षा २.२५% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.११,७६,४७२/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६५ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.३ अंतर्गत स.नं.९१ मधील खुल्या जागेला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रकमेपेक्षा २.२५% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१६,४७,४५५/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६६ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.३ अंतर्गत स.नं.१२८, स.नं.१२९/२/२+३, स.नं.१३०/१ मधील खुली जागेत चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रकमेपेक्षा १.७१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,५५,५७७/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६७ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.७ अंतर्गत शिव कॉलनी ग.नं. ५९, खुली जागा येथे चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ०.०९% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१०,५७,३३२/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६८ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.८ मध्ये निमखेडी ग.नं. ७८, खुली जागेला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा १.०९% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,१९,२३८/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६९ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.८ निमखेडी ग.नं. ११२, ओपनस्पेला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार पद्मालया कन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ३.०३% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२०,२४,१९८/- मात्र खर्चाची संविदा.

१७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७० दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा ग.नं.६१/१/अ + ६१/२+३ मधील ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार संदेश टेकाडे यांचे निविदा रकमेपेक्षा ०.००१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२१,०२,३७९/- मात्र खर्चाची संविदा.

१८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७१ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा ग.नं. ६९, मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा ०.००१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१५,८३,९८४/- मात्र खर्चाची संविदा.

१९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७२ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा ग.नं. १४५, १४३, १५१/१ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार श्री प्रविण काशिनाथ राणे यांचे निविदा रकमेपेक्षा १.७१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२३,७८,०७४/- मात्र खर्चाची संविदा.

२०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७३ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं. ४५२ संभाजी नगर मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार देवेंद्र अनिल तायडे यांचे निविदा रकमेपेक्षा १४% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१७,८५,८३६/- मात्र खर्चाची संविदा.

२१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७४ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.१३ मधील मेहरुण स.नं. ४५५/४ रायसोनी नगर मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार देवेंद्र अनिल तायडे यांचे निविदा रकमेपेक्षा १४% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.८,९६,३०७/- मात्र खर्चाची संविदा.

२२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७५ दि.१८/०९/२०१९ अन्वये १४ वा वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त निधीतुन प्रभाग क्र.१ पिंप्राळा ग.नं.२८ मधील खुली जागेला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार रामेश्वर बन्सिलाल धामणे यांचे निविदा रकमेपेक्षा ०.०८% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,६२,४०७/- मात्र खर्चाची संविदा.

२३. प्रशासकीय आदेश क्र.आरोग्य/०६ दि.१७/०७/२०१९ अन्वये आव्हाणे शिवार गट क्रं.८६४ येथील प्रकल्पावरील जमा झालेला कचरा (D६Bकॅट) डोझरच्या सहाय्याने ढकलणे व रस्त्यात पडलेला कचरा बाजुला करणे कामी मक्तेदार श्री.शशिकांत गोविंदा कोल्हे यांचे १ डोझर वाहन चालक व इंधनासह भाडे तत्वावर लावणेसाठी आलेले दर स्विकारुन रक्कम रु.९,२८,०००/- मात्र खर्चाची संविदा.

२४. प्रशासकीय आदेश क्र.वाहन/३३ दि.१५/१०/२०१९ अन्वये महानगरपालिका मालकीच्या अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या वाहनांचे सुरक्षेच्या दृष्टीने विमा नुतनीकरण करणे कामी मक्तेदार युनायटेड इंन्शुरन्स कंपनी लि.जळगांव यांचे दर स्विकारुन रक्कम रु.२,३८,५९२/- मात्र खर्चाची संविदा.

प्रशासनाने उक्त प्रमाणे कामे करताना यापुढे मक्तेदारास दिलेल्या कामाचे ठिकाणी ग्रेनाईटमध्ये कोनशिला बसविणेस बंधनकारक करावे व सदर कामाची कोनशिला बसवितांना त्यामध्ये कामाचे नांव, काम कोणत्या निधीतून करण्यात आले त्याची माहिती तसेच सर्व संबंधितांची व सन्मा.सदस्यांची सुध्दा नावे नमुद करण्यात यावीत व मक्तेदारा सोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यात सदरची अट समाविष्ट करण्यात यावी. याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- बालाणी भगतराम रावलमल**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**